S.Y.M.A.(Part-II) (Marathi)(with Credits)-Regular-Semester 2012 Sem. III

**MAMR232-12-11-Paper-II :**

**Vishesh Granthkar-Keshav Meshram (विशेष ग्रंथकार-केशव मेश्राम) /**

**Vishesh Granthkar-Tukaram (विशेष ग्रंथकार-तुकाराम)**

P. Pages : 2 * 3 7 7 2 * **GUG/W/16/2906/2907**

*Vishesh Granthkar-Keshav Meshram (विशेष ग्रंथकार-केशव मेश्राम)*

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** ''निसर्गाच्या विविध कळा त्यांतल्या सर्व तरल छटांसह रंगवणाऱ्या त्यांच्या लेखणीला शहरी जीवनातले रुक्ष, कडवट अनुभव चित्रित करताना तीक्ष्ण शस्त्राची धार चढते'' हे विधान 'उत्खनन' काव्य संग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. **15**

**किंवा**

कवी केशव मेश्राम यांच्या काव्यशैलीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**2.** ''सतत परावर्तित होणारे कालचक्र, व्यक्तिमनातील सुक्ष्मसल आणि सर्वहारा वर्गातील अनेक जखमांचा ठणका त्यांच्या कवितेत उमटतो'' या विधानाचा 'कृतकपुत्र' या काव्यसंग्रहाद्वारे परामर्श घ्या. **15**

**किंवा**

''आंबेडकरी जाणिवांच्या कवितांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात प्रा. केशव मेश्राम यांचा मोलाचा वाटा आहे'' हे 'कृतकपुत्र' या काव्यसंग्रहाच्या आधाराने स्पष्ट करा.

**3.** केशव मेश्राम यांच्या 'पत्रावळ' कथासंग्रहातील कथा वाचताना आपल्या अभिरुचीला धक्के बसू लागतात हे सिध्द करुन दाखवा. **15**

**किंवा**

'धगाडा' या कथासंग्रहातील कथांद्वारे कथाकार केशव मेश्रामांच्या सामर्थ्याचा साधार आढावा घ्या.

**4.** केशव मेश्राम यांच्या शैलीविषयक विचारांचा व परिवर्तनवादी समीक्षेचा दृष्टिकोन 'प्रश्नशोध' या ग्रंथाच्या आधारे स्पष्ट करा. **15**

**किंवा**

गोविंदाग्रजांच्या तीन विशेष कविताविषयीचे केशव मेश्राम यांनी केलेले भाष्य 'प्रश्नशोध'च्या आधारे स्पष्ट करा.

**5.** पुढीलपैकी **कोणत्याही दोन** विषयांवर टिपणे लिहा. **20**

1) कृतकपुत्र मधील 'कैवारी' कविता.

2) 'उत्खनन' काव्यसंग्रहातील दलित वर्गाची कुचंबणा

3) धगाडा कथासंग्रहातील 'नुसात्या'

4) दंडारीचा कवनकार शाहीर राजोबा

**************

# *Vishesh Granthkar-Tukaram (विशेष ग्रंथकार-तुकाराम)*

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** संत तुकारामकालीन महाराष्ट्रातील सामाजिक धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचे वर्णन करा. **15**

**किंवा**

'तुकारामांचे अभंग म्हणजे जनसामान्यांच्या भावजीवनाचा आरसा होय' या विधानाचा परामर्श घ्या.

**2.** संत तुकारामांचे जीवन - चरित्र सांगून त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घ्या. **15**

**किंवा**

तुकारामांच्या आत्मचरित्रपर अभंगातून व्यक्त झालेल्या काव्यशैलीचे दर्शन घडवा.

**3.** तुकारामांच्या पाईकीच्या अभंगातील आशय स्पष्ट करा. **15**

**किंवा**

'हिंदुस्थानी पदे' अभंगामधून तुकारामांनी कोणते भाव प्रकटीकरण केलेले आहे.

**4.** संत तुकारामांचे खेळावरील रुपकाचे अभंग उलगडून दाखवा. **15**

**किंवा**

मंगलाचरणातील अभंगाद्वारे तुकारामांनी घडविलेल्या श्री विठ्ठलरुप दर्शनावर प्रकाश टाका.

**5.** पुढीलपैकी **कोणत्याही दोन** विषयांवर टिपणे लिहा. **20**

1) गौळणीचे अभंग

2) शेतावरचे अभंग

3) आरत्यांचे अभंग

4) घोंगळीचे अभंग

******************

munotes.in